नि.फौ.ख.क्र.२३५/२०२३
सरकार –वि– रामकृष्ण व इतर
<u>निशाणी क्रमांक ३४</u>

<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरू</u> :–

माझे नाव :– श्रीकृष्ण शत्रुघ्न राऊत
वय :– ६५ वर्ष, व्यवसाय :– शेती,
राहणार :– बेलुरा, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u> :–

१. मी आरोपींना ओळखतो. ते माझ्या गावात राहतात. पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कोठेही बोलाविले नाही. माझ्यासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी माझी सही घेतली होती. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीपुरता **नि.क्र.३५** देण्यात येतो. **(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणन खरे आहे की दिनांक २३.११.२०२२ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या दरम्यान मी गावात हजर होतो व पोलीस गावात आले होते. मी फिर्यादीला ओळखतो. हे म्हणने खरे नाही की फिर्यादी पोलीसांसोबत हजर होता. हे म्हणने खरे नाही फिर्यादीने माझेसमक्ष पोलीसांना घटनास्थळ दाखविले. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळाची सविस्तर पाहणी केली. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळावरुन फिर्यादीला मारहाण झालेली कु–हाड जप्त केली. त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा करुन मला वाचुन दाखविला व माझी सही घेतली. हे म्हणने खरे नाही की मी आरोपींना ओळखत असल्यामुळे आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री.शेख वकील यांनी नाकारला.</u>

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.** **माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.05.07 12:56:43 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०७.०५.२०२६.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०७.०५.२०२६**